पोलीस अधीक्षक, कार्यालय लोहमार्ग, औरंगाबाद
एन.१०.HUDCO.भारत माता चौक पोलीस कॉलनी रोड, डोसीटोसी
इमारत औरंगाबाद ४३१००३ दुरध्वनी क्र 0240 2390100
EMAIL-sp.railway-abad@mahapolice.gov.in

## पोलीस शिपाई भरती २०२१ लेखी परीक्षा बाबत

औरंगाबाद लोहमार्ग पोलीस आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती. २०२१ च्या अनुषंगाने पोलीस शिपाई यांचे १०८ पदाकरीता शैक्षणिक व मैदानी चाचणी परिक्षा ही पूर्ण करण्यात आली आहे या प्रक्रियेद्वारे गुणवत्तेच्या आधारे लेखी परिक्षा करिता एकूण १२४३ उमेदवार हे पात्र झाले आहे त्यामध्ये ८७९ पुरुष उमेदवार व तर ३६४ महिला उमेदवारांचा समावेश आहे.

दि.०२/०४/२०२३ रोजी सकाळी ०८.३० वाजता पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा असुन या करीता उमेदवार यांनी परीक्षा केंद्रावर सकाळी ०६.३० वाजेला उपस्थित रहाणे अत्यावश्यक आहे. परिक्षा स्थळ हे मौलाना आझाद कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स ॲण्ड कॉमर्स, डॉ. रफीक झकेरिया कॅम्पस, डॉक्टर रफीक झकेरिया मार्ग, रोझा बाग रोड, औरंगाबाद येथे उमेदवार यांनी सोबत मैदानी चाचणी व लेखी चाचणीचे मुळ परिक्षा प्रवेशपत्र तसेच आधारकार्ड अथवा शासकीय ओळखपत्र सोबत ठेवावे.

पोलीस अधीक्षक लोहमार्ग औरंगाबाद यांनी उमेदवारांना सुचना केल्या आहेत कि, उमेदवारांना परिक्षा केंद्रावर परिक्षे करिता पॅड व पेन हे पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे त्यामुळे उमेदवारांनी परिक्षा केंद्रावर सोबत कोणत्याही प्रकारचे मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक गैजेट, डिजिटल घड्याळ ब्ल्यूटूथ डिडिव्हाईस, किंमती व मौल्यवान साहित्य आणू नये.

पोलीस अधीक्षक यांचे नियंत्रणाखाली ही संपूर्ण भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक व निःपक्षपणे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन भरती प्रक्रिया राबविली आहे. उमेदवारांनी कोणाच्याही भूलथापाना// आमिषाला / प्रलोभनाला बळ पडु नये. कोणीही भरती करुन देतो असे आश्वासन देत असल्यास तात्काळ वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन पोलीस अधीक्षक यांचे द्वारे करण्यात येत आहे.

(गणेश शिंदे)
पोलीस अधीक्षक लोहमार्ग
औरंगाबाद